स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (प.),
ता.वसई, जि.पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी : ०२५ - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५ - २५२५१०७
ई-मेल :

जावक क्र.: व.वि.श.म./वाचनालय/२७/२०२६-२७
दिनांक :२७/१०/२०२६

# जाहीर दरपत्रक सूचना

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालये व त्यांच्याशी संलग्न अभ्यासिकांसाठी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरिता लागणारे दैनंदिन वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके, नियतकालिके, वार्षिके व दिवाळी अंक इत्यादी वाचनसाहित्य दरपत्रक मागवून पॅनल पध्दतीने खरेदी करावयाचे आहेत. त्याकरिता सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत जाहिर दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रकामध्ये दरपत्रकधारकाने मराठी, इंग्रजी, गुजराती, हिंदी व उर्दु अश्या विविध भाषेतील वर्तमानपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, वार्षिके व दिवाळी अंक इ.वाचनसाहित्याच्या मुल्य किंमतीवर किती टक्के सूट देणार ? हे स्वतंत्रपणे सादर करावयाचे आहेत. दरपत्रकधारकाने वरील कामाचे दरपत्रक द्विलखोटा पध्दतीने दि. २५/१०/२०२६ ते दि. ०५/११/२०२६ रोजी दुपारी ४.00 वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय, विरार (पूर्व) येथे दुसरा मजल्यावरील कार्यालयात दिलेल्या मुदतीत जमा करावयाचा आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | तपशिल | सर्व प्रकारच्या वाचनसाहित्याचे एकत्रित दर (सूट) टक्केवारी अंकात व अक्षरात नमूद करावी. |
|---|---|---|---|
| १. | सर्व सार्वजनिक वाचनालये व त्यांच्याशी सलंग्न अभ्यासिकांसाठी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरिता लागणारी दै. वर्तमानपत्र, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके व दिवाळी अंक इ.वाचनसाहित्य पुरवठा करणे. | वर्तमानपत्रे | |
| | | साप्ताहिके | |
| | | पाक्षिके | |
| | | मासिके | |
| | | नियतकालिके | |
| | | वार्षिके | |
| | | दिवाळी अंक | |

**अटी शर्ती :-**

१. दरपत्रकधारकाने स्वतःचे / संस्थेचे लेटरहेडवर दरपत्रक सादर करावयाचे आहे.

२. दरपत्रकधारकाने दरपत्रक सादर करताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावयाचा आहे त्यापैकी लिफाफा क्र.०१ हा तांत्रिक बाबींचा असून त्यामध्ये प्रामुख्याने स्वतःचे / संस्थेचे पॅनकार्ड, आधारकार्ड, **वर्तमानपत्र, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके व दिवाळी अंक इ.वाचनसाहित्य पुरवठा केल्याचा शासकीय किंवा निमशासकीय कार्यालयाचा अनुभव दाखला किंवा कायदिश इ.**सर्व कागदपत्रांची छायांकित प्रत काढून ती स्वयंसाक्षांकित करून त्यासोबत इसारा रक्कम (एकूण मंजूर रक्कमेच्या १%) रु.१०,०००/- इतक्या रक्कमेचा धनाकर्ष, ही सर्व कागदपत्रे लिफाफा क्र.०१ (तांत्रिक बाबींचा लिफाफा) मध्ये भरून लिफाफा सिलबंद करावा. तसेच लिफाफा क्र.०२ हा वित्तीय बाबींचा असून त्यामध्ये दरपत्रकधारकाने नमूद कामासाठी आपले सर्व करासहित असलेले सवलतीचे दर नमूद करावेत (दर नमूद करताना कोणत्याही स्वरुपाची खाडाखोड करू नये.) व लिफाफा क्र.०२ सिलबंद करावा.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (प.),
ता.वसई, जि.पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी : ०२५ - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५ - २५२५१०७
ई-मेल :

जावक क्र.: व.वि.श.म./वाचनालय/२७/२०२६-२७
दिनांक २५/१०/२०२६

३. दरपत्रकधारकाने सादर केलेल्या लिफाफ्यापैकी लिफाफा क्र. **०१** या तांत्रिक बाबींच्या लिफाफ्यामधील कागदपत्रे अपूर्ण असल्यास अश्या दरपत्रकधारकाचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येणार नाही. पडताळणी अंती सदरचे दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल.

४. वरील पद्धतीमध्ये खोटी कागदपत्रे/ धनाकर्ष सादर करणाऱ्या दरपत्रकधारकांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित दरपत्रकधारकांचा काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल यासंबंधी माननीय आयुक्त आणि माननीय उपायुक्त यांना पूर्ण अधिकार राहतील.

५) मुदतीत प्राप्त झालेली कोणतीही अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. आयुक्त व.वि.श.म यांनी राखून ठेवलेला आहे.

६) दरपत्रकधारकाने नमूद वाचनसाहित्याचा पुरवठा सार्वजनिक वाचनालयाने नेमून दिलेल्या ठिकाणी मुदतीत व वेळेत करावयाचा आहे.

७) मनुष्यबळ, वाहन व यंत्रसामुग्री महानगरपालिका पुरविणार नाही.

८) नैसर्गिक आपत्तीमुळे होणा-या जिवित व वित्त हानीस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

९) नमूद कामाचा पुरवठा करताना दरम्यान होणा -या अपघात अथवा दुर्घटना यामुळे होणा -या जिवित व वित्त हानीस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१०) शासनाचे विविध प्रकारचे कर शासनास / महानगरपालिकेच्या फंडात जमा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची आहे.

११) करारनामा झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव कामातून माघार घेता येणार नाही.असे झाल्यास संबंधित दरपत्रकधारकाने भरलेली इसारा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१२) उक्त नमूद काम करताना सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत कामासंबंधी वेळोवेळी देण्यात येणा-या वेगवेगळया सुचनांचे पालन करणे दरपत्रकधारकास बंधनकारक आहे.

१३) कामासंबंधी भविष्यकाळात लेखापरिक्षणात काही त्रुटी आढळल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ही संबंधित दरपत्रकधारकाची राहील. कामासंबंधी कोणत्याही स्वरूपात अग्रीम रक्कमेची मागणी दरपत्रकधारकास करता येणार नाही.

१४) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर दरपत्रकधारकाने **०५** दिवसांचे आत कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून सदरच्या कामाचा करारनामा रूपये ५००/- स्टॅम्पपेपरवर करावयाचा असून मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

१५) वरील अटीचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.

१६) सदरचे दरपत्रक महानगरपालिकेच्या सुचना फलकावर व अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

२५/१०/२६

उप -आयुक्त (वाचनालय)
वसई विरार शहर महानगरपालिका